नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162


दैनिक
# यश सिद्धि न्यूज
YASH SIDDHI NEWS

संपादक : कमलाकर सोनकांबळे

वर्ष - २ रे Year - 2nd | अंक - १७१ Issue - 171 | वार शुक्रवार दि. ८ नोव्हेंबर २०२४ Blow- Friday Date 8 November 2024 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# राष्ट्रीय दहशतवाद विरोधी धोरण लवकरच

## राष्ट्रीय तपास संस्थेच्या परिषदेत अमित शहा यांचे प्रतिपादन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : नरेंद्र मोदी सरकार देशातील दहशतवाद समूळ नष्ट करण्यासाठी आणि त्याविरोधात ठोस रणनीती घेऊन पुढे जाण्यासाठी कटिबद्ध असल्याचे केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी गुरुवारी सांगितले. दहशतवाद-ाला कोणतीही प्रादेशिक सीमा नसते. केंद्र आणि राज्यामध्ये संयुक्त धोरण आखून गुप्तचर माहिती एकमेकांपर्यंत पोहोचवण्याची गरज असल्याचे या वेळी शहा म्हणाले.

राष्ट्रीय तपास संस्थेने (एनआयए) आयोजित केलेली दोन दिवसीय दहशतवादविरोधी परिषद गुरुवारी सुरू झाली. तंत्रज्ञानाशी संबंधित आव्हाने आणि संधी, आंतरराष्ट्रीय कायदेशीर सहकार्य आणि भारतातील दहशतव-ादाचा मुकाबला करण्यासाठी आवश्यक धोरणांवर या परिषदेत प्रामुख्याने चर्चा होणार आहे. तसेच भारताच्या सुरक्षा व्यवस्थेला अधिक बळकटी देण्याच्या दृष्टिकोनातून विचारमंथन होईल. त्याचबरोबर दहशतवादाविरुद्ध एकत्रित कारवाई करण्यासाठी विविध तपास संस्थांमध्ये समन्वय साधणे तसेच भविष्यातील धोरण तयार करण्यासाठी ठोस माहिती सादर करणे हे या दहशतवादविरोधी परिषदेचे मुख्य लक्ष आहे.

सुरक्षा दलांतील तरुण अधिकाऱ्यांना प्रशिक्षणाबरोबरच दहशतवादाचा सामना करण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करण्याची आवश्यकता असल्याचे परिषदेला संबोधित करताना शहा यांनी म्हटले. शहा यांनी २०१४ पासूनच्या म ोदी सरकारच्या दहशतवादविरोधातील कामगिरीवरही प्रकाश टाकला. या काळातील दहशतवादी घटना मागील दशकाच्या तुलनेत ७० टक्क्यांनी कमी झाल्याचा दावा त्यांनी केला.

तसेच राज्य आणि केंद्र सरकारच्या संयुक्त प्रयत्नांमुळे गेल्या १० वर्षांत जम्मू-काश्मीर, नक्षलग्रस्त भाग आणि ईशान्येकडील राज्यांतील हिंसाचारावर नियंत्रण मिळवण्यात यश आल्याचेही त्यांनी सांगितले. तसेच केंद्र सरकारची दहशतवादविरोधी तपास संस्था असलेल्या एनआयए सर्व दहशतवादी प्रकरणांमध्ये प्रभावीपणे ह्यूएपीएचा वापर केल्याची माहितीही या वेळी त्यांनी दिली.

**'एनआयए'ची कार्यकक्षा वाढवणार**

परिषदेत अमित शहा यांनी राज्य पोलीस दलाच्या प्रतिनिधींना आवश्यक त्या सूचना करताना राज्यांच्या पो-लीस प्रमुखांना पोलीस ठाण्याच्या पातळीपर्यंत समन्वय निर्माण करण्यास आणि दहशतवादाविरुद्ध मजबूत साखळी उभी करण्यास सांगितले. या वेळी त्यांनी परदेशातील दहशतव-ादी प्रकरणांचा छडा लावण्यासाठी 'एनआयए'ची कार्यकक्षा वाढवण्यात येणार असल्याचे म्हटले आहे. दहशतवादी तसेच नक्षलवाद्यांना मि ळणारा निधी रोखण्यासाठी २५ कलमी एकात्मिक योजना तयार करण्यात आली असल्याची माहिती या वेळी शहा यांनी दिली.

दहशतवादी आणि त्यांच्या परिसंस्थेशी लढण्यासाठी सरकार लवकरच राष्ट्रीय दहशतवाद विरोधी धोरण आखणार असल्याचे अमित शहा यांनी सांगितले. कायदा आणि सुव्यवस्था हा राज्या-राज्यांचा विषय आहे. राज्यांना भौगोलिक सीमा आणि घटनात्मक मर्यादा आहेत, परंतु दहशतवाद्यांना यापैकी कोणत्याही मर्यादा नसतात. म्हणून केंद्र आणि राज्याच्या सर्व सुरक्षा यंत्रणांना सम न्वयाने काम केले पाहिजे. त्यासाठी संयुक्त धोरण आखणे आवश्यक असल्याचे शहा म्हणाले.

# उदगीर येथे भीषण अपघात, चार महिला जागीच ठार




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लातूर : उदगीर तालुक्यातील एकुर्काजवळ कारचा भीषण अपघात झाला आहे. या अपघातात ४ महिला जागीच ठार झाल्या आहेत. तर तीन जण जखमी झाले आहेत. जखमींना तातडीने शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. मि ळालेल्या माहितीनुसार, उदगीर तालुक्यातील एकुर्काजवळ आज गुरुवारी दुपारी २ डिझायर कारनी या महिला उदगीरहून एकुर्काकडे जात होत्या. एकुरका गावाज-वळ पोहोचले असताना भरधाव आयशर टेम्पोला धडकली. हा अपघात इतका भीषण होता की, यात कारचा चुराडा झाला. अपघातात चार महिला जागीच ठार झाल्या.

**तिघांची प्रकृती चिंताजनक, एकुर्काजवळ घडली दुर्घटना**

या अपघातात मंगलबाई गोविंद जाधव (वय ५५ वर्षे, राहणार एकुर्का), प्रतिभा संजय भंडे (वय ३०, राहणार दावण-गाव), प्रणिता पांडुरंग बिरादार (वय २५, राहणार होणाळी) अनन्या रणजित भंडे (वय १४ वर्षे, राहणार दावणगाव) यांचा अपघातात जागीच मृत्यू झाला आहे. अन्य तिघा जखमींवर उपचार सुरू आहेत.

सर्व मृतदेह शवविच्छेदन करण्यासाठी उदगीर सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले आहेत. एकाच वेळी चार महिलांचा मृत्यू झाल्यामुळे गावावर शोककळा पसरली आहे. रुग्णालयाच्या परिसरात कुटुंबीयांचा आक्रोश काळीज पिळवटून टाकणारा होता. या प्रकरणाची पोलिसांनी नोंद केली असून अधिक तपास करत आहे.

# १२ नोव्हेंबर रोजी सोलापुरात पंतप्रधान मोदी, उद्धव ठाकरेंच्या प्रचारसभा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : दिवाळी सरताच विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी वाढली आहे. महायुती विरुद्ध महाविकास आघाडी यांच्या संघर्षामध्ये दोन्ही बाजूंकडील अनेक बलाढ्य नेते सोलापूर जिल्ह्यात येत आहेत. येत्या १२ नोव्हेंबर रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि शिवसेना उद्धव ठाकरे पक्षा-चे प्रमुख उद्धव ठाकरे हे दोघे एकाच दिवशी सोलापुरात प्रचार सभांसाठी येत आहेत. त्या वेळी या दोन्ही नेत्यांची राजकीय जुगलबंदी पाहावयास मिळणार आहे.

उद्धव ठाकरे हे सोला-पूर जिल्ह्यात सोलापूर दक्षिण, सांगोला आणि बार्शी या तीन मतदारसंघांमध्ये आपल्या पक्षाच्या उमेदवाराचा प्रचार करण्यासाठी येत आहेत. १० नोव्हेंबर रोजी त्यांची पहिली सभा सांगोल्यात होणार आहे. त्यानंतर सायंकाळी सोला-पूर दक्षिण मतदारसंघात दुसरी सभा होणार आहे. १२ नोव्हेंबर रोजी ते पुन्हा सोलापूर जिल्ह्यात बार्शी येथे प्रचार सभेसाठी येणार आहेत.

विशेषतः सांगोला येथे 'काय झाडी, काय डोंगार, काय हॉटेल' या खास मानदेशी भाषाशैलीतून साधलेल्या संवादामुळे गाज-लेले सांगोल्याचे आमदार शहाजीबापू पाटील यांच्यावर उद्धव ठाकरे हे कशाप्रकारे टीकेची तोफ डागतात, याची सार्वत्रिक उत्सुकता आहे. याच पार्श्वभूमीवर उद्धव ठाकरे यांच्या प्रचारसभांकडे सर्वांचे लक्ष वेधले असताना पंतप्रधान नरेंद्र मोदी हेदेखील उद्धव ठाकरे यांच्या बार्शी दौऱ्याच्या दिवशीच येत आहेत. १२ नोव्हेंबर रोजी दुपारी त्यांची जाहीर सभा होम मैदानावर होणार असून, त्याची जय्यत तयारी केली जात आहे. उद्धव ठाकरे आणि नरेंद्र मोदी हे एकाच दिवशी सोल-ापुरात आल्यानंतर त्यांच्याकडून एकमेकांच्या विरोधात टीकेचा मारा कशा पद्धतीने होणार, याची सार्वत्रिक उत्सुकता कायम आहे.

# सोलापूर जिल्हा सत्र न्यायालयाचा निकाल; अत्याचार प्रकरणी आठ जणांना जन्मठेप, तिघांना सक्तमजुरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : ओळखीच्या माध्यमातून एका मागासवर्गीय अल्पवयीन मुलीशी सलगी करून तिच्यावर सामूहिक लैंगिक अत्याचार केल्याबद्दल पाच रिक्षाचालकांसह आठ जणांना दुहेरी जन्मठेप, तर अन्य तिघा आरोपींना २० वर्षे सक्तमजुरीची शिक्षा सोलापूरच्या जिल्हा सत्र न्यायालयाने ठोठावली आहे.

सचिन श्रीकांत राठोड (वय २४), प्रवीण श्रीकांत राठोड (वय २२), गणेश ऊर्फ अक्षय विष्णू चव्हाण (वय २२, तिघे रा. प्रतापनगर लमाण तांडा, विजापूर रोड, सोलापूर), करण विजयकांत भरले (वय १९, रा. सोरेगाव, सोलापूर), गौरव विलास भोसले (वय ३०, रा. निराळे वस्ती, मुरारजी पेठ, सोलापूर) या सर्व रिक्षाचालकांसह राज ऊर्फ राजकुमार सिद्राम देसाई (वय ३३, रा. एसटी कॉलनी, नवीन आरटीओजवळ, सोलापूर), दिनेश परशु राठोड (वय १९), सतीश अशोक जाधव (वय ३०), रोहित श्याम राठोड (रा. प्रतापनगर लमाण तांडा, सोलापूर) अशी शिक्षा ठोठावण्यात आलेल्या आर-ोपींची नावे आहेत. यातील आरोपी सचिन राठोड, राज ऊर्फ राजकुमार देसाई आणि गौरव भोसले यांना प्रत्येकी २० वर्षे सक्तमजुरी सुनावण्यात आली, तर अन्य आठ आरोपींना जन्म ठेप ठोठावण्यात आली आहे. जिल्हा व सत्र न्यायाधीश एस. व्ही. केंद्रे यांनी या खटल्याचा निकाल सुनावला.

या खटल्यातील पीडित अल्पवयीन मुलगी मागासवर्गीय समाजाची असून, ती ऑगस्ट २०१९पासून सोलापुरात एका शैक्षणिक संस्थेत शिक्षण घेत असताना तिच्याशी रिक्षा-चालक आरोपी सचिन राठोड याची ओळख झाली होती. नंतर त्याचे रूपांतर प्रेमात झाले होते. त्यातूनच त्याने लग्नाचे आमिष दाखवून पीडित मुलीला एका लॉजमध्ये नेऊन तिच्यावर जबरदस्तीने लैंगिक अत्याचार केले होते. असे प्रकार दोन-तीन वेळा झाल्यानंतर त्यात आरोपी सचिन राठोड याचे अन्य साथीदार सहभागी झाले. जुळे सोलापुरात तिच्यावर सामूहिक लैंगिक अत्याचार केल्यानंतर सर्व आरोपी पुन्हा चटावले होते. त्यातून शारीरिक व मानसिकदृष्ट्या खचलेल्या पीडित मुलीने आपल्यावरील अत्याचाराला वाचा फोडली. तिच्या फिर्यादीवरून विजा-पूर नाका पोलीस ठाण्यात सर्व आरोपींविरुद्ध ट्रॉसिटी कायद्यासह बाललैंगिक शोषण कायद्याखाली गुन्हा दाखल झाला होता. गुन्हा घडल्यानंतर सर्व आरोपी कर्नाटकात लपून बसले होते. शहराचे तत्कालीन पोलीस आयुक्त अंकुश शिंदे यांनी या गुन्ह्याची गंभीर दखल घेऊन सखोल तपासाचा आद-ेश दिला होता. तत्कालीन सहायक पोलीस आयुक्त डॉ. प्रीती टिपरे यांनी तपास केला. या खटल्यात जिल्हा सरकारी वकील प्रदीपसिंह राजपूत यांनी ३८ साक्षीदारांची तपासणी केली. यात पीडित मुलीसह तिची आई, वैद्यकीय अधिकारी, पोलीस तपास अधिकारी आदींची साक्ष महत्त्वपूर्ण ठरली. आरोपींतर्फे ना-गराज शिंदे, इस्माईल शेख, सुरेश चव्हाण, एस. एम. झुरळे, फिरोज शेख या वकिलांनी बाजू मांडली. जिल्हा सरकारी वकील राजपूत यांनी केलेला युक्तिवाद मान्य करून न्यायालयाने सर्व आरोपींना दोषी धरून शिक्षा सुनावली.



# शरद पवारांबद्दल केलेल्या वक्तव्यावर सदाभाऊ खोत यांची जाहीर माफी

सांगली: राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते शरद पवार यांच्यावर करण्यात आलेल्या वक्तव्या चर्चेत आलेले रयत क्रांती संघटनेचे सदाभाऊ खोत यांनी आता सारवास-ारव केली आहे. सांगलीमध्ये गोपीचंद पडळकर यांच्या प्रचारसभेत बोलताना खोत यांनी खालच्या पातळीवरील वक्तव्य केले होते. त्यांच्या या वक्तव्यानंतर संपूर्ण राज्यातून टीका झाली. अजित पवारांनी देखील यावर तीव्र शब्दात नाराजी व्यक्त केली. यावर आता स्वत: सदाभाऊ खोत यांनी स्पष्टीकरण दिले आहे. मी कोणाच्या आजारपणावर किंवा व्यंगावर बोललो नव्हतो तर सामाजिक आणि राजकीय चेहऱ्यावर बोललो होतो. निवडणुकीच्या काळात काही भावनिक मुद्दे निर्माण करून आपल्याला निवडणूक जिंकता येतील का यात संपूर्ण महाविकास आघाडी गुंतलेली दिसते. कोणाच्या भावना मी दुखावल्या असतील तर मी माझे शब्द मागे घेतो आणि दिलगिरी व्यक्त करतो, असे खोत म्हणाले.

**मनसे प्रमुख राज ठाकरेंचं वरळीतील सभेत विधान** | **मविआ, महायुतीवर टीका**

# सत्ता हातात द्या पहिल्या ४८ तासांत मशिदीवरचे भोंगे काढतो

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : विधानसभेच्या निवडणुकीची रणधुमाळी राज्यात सुरु आहे. २० नोव्हेंबर रोजी मतदान आणि २३ नोव्हेंबर रोजी या निवडणुकीचा निकाल जाहीर होणार आहे. त्यामुळे २३ नोव्हेंबरच्या दिवसाकडे अनेकांचे लक्ष लाग-लेलं आहे. या निवडणुकीत महायुती विरुद्ध महाविकास आघाडीत मुख्य लढत पाहायला मिळणार आहे. सध्या राज्यभरात विविध मतदारसंघात दिग्गज नेत्यांच्या प्रचार सभा सुरु आहेत. या सभांच्या माध्यमातून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोप सुरु असल्याचंही पाहायला मिळत आहे. आज मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची म ुंबईतील वरळी मतदारसंघात जाहीर सभा पार पडली. या सभेत बोलताना राज ठाकरे यांनी उद्धव ठाकरे, शरद पवार, अजित पवार यांच्यावर हल्लाबोल केला.

तसेच यावेळी राज ठाकरे यांनी पुन्हा एकदा मशिदीवरचे भोंगेंच्या विषयावरून मोठं भाष्य केलं आहे. सत्ता हातात द्या, पहिल्या ४८ तासांत मशिदीवरचे भोंगे काढतो, असं राज ठाकरे यांनी म्हटलं आहे.

उद्धव ठाकरे कसे मुख्यमंत्री झाले हे सर्वांना माहिती आहे. सध्याच्या काळात काहीही विचारधारा उरलेली नाही. २०१९ नंतर कोणाचं सरकार येणार? हेच आपण पाहत बसलो होतो. एकेदिवशी सकाळी ६ वाजता कळलं की अजित पवार आणि देवेंद्र फडणवीस हे शपथ घेत आहेत. आधी तर विश्वासच बसला नाही. आर्धा तास ते लग्न टिकलं. आर्ध्या तासाच घटस्फोट झाला. त्यानंतर लगेच उद्धव ठाकरे यांनी राष्ट्रवादी आणि काँग्रेस बरोबर गेले. मग यांना काही जणाची नाही आणि मनाची नाही. ज्यांच्या विरोधात निवडणुका लढवल्या



त्यांच्या बरोबर सत्तेत जाऊन बसले. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री झाल्यानंतर अडीच वर्ष बाळासाहेब ठाकरे यांच्या अनेक बॅनर्सवरील नावापुढचं हिंदूहृदयसम्राट हे नाव काढलं. हे का काढलं तर राष्ट्रवादी आणि काँग्रेसला वाईट वाटेल आणि त्यांना ते परवडणारं नाही. तसेच काही उर्दू बॅनर्सवर जनाब बाळासाहेब ठाकरे नाव टाकलं. आज ते हयात असायला हवे होते. त्यांनी एकएकाला फोडून काढलं असतं, असा हल्लाबोल राज ठाकरे यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर केला.

आज काही मौलवी फतवे काढत आहेत. काय फतवे काढत आहेत? तर सर्वच्या सर्व मते हे महाविकास आघाडीच्या पारड्यात टाकावी. जर ते फतवे काढत असतील तर आज मी देखील फतवा काढतो. येणाऱ्या निवडणुकीमध्ये माझे ज्या मतदारसंघात उमेदवार असतील तेथे जनतेने आमच्या पाठीशी उभे राहावं. उद्या सत्ता हातात दिल्यानंतर पहिल्या ४८ तासांत सर्व मशिदीवरचे भोंगे पहिल्या पहिल्या ४८ तासांत खाली उतरवले ना? तर परत राजकारण सांगणार नाही. जर त्यांनी अंगावर येण्याचा प्रयत्न केला तर हे आमच्या खाकी वर्दीतले आहेत ना त्यांना आदेश देईल आणि ते रजा अकादमीचा बदला घेऊन टाकतील, असं राज ठाकरे यांनी म्हटलं आहे.

# कलम ३७० मुद्द्यावर जम्मू काश्मीरच्या विधानसभेत खडाजंगी



श्रीनगर : सहा वर्षांनंतर स्थ-ापन झालेल्या जम्मू काश्मीरच्या विधानसभेत आज खडाजंगी झाली. कलम ३७० पुन्हा लागू करण्याची मागणी अपक्ष आमदार शेख खुर्शीद यांनी केली. हातात फलक घेऊन ते विधानसभेत आल्याने गदारोळ झाला. या फलकाला भाजपा आम दारांनी वेलमध्ये येऊन निषेध नोंदवला. तर या दरम्यान दोन्ही पक्षाच्या आमदारांमध्ये हातापायीही झाली. खासदार इंजिनिअर रशिद यांचे बंधू अपक्ष आमदार खुर्शीद शेख कलम ३७० पुन्हा लागू करणे आणि सर्व राजकीय कैद्यांची सुटका करण्याच्या मागणीसाठी फलक घेऊन सभागृहाच्या वेलमध्ये आले. खुर्शीद यांच्याकडून बॅनर काढून घेण्याच्या प्रयत्नात भाजपा आमदारांनीही वेलमध्ये धडक दिल्याने बाचाबाची झाली. सज्जाद लोन, वाहिद पारा आणि काही नॅशनल कॉन्फरन्स सदस्यांनीही खुर्शीद यांना समर्थन दिले. त्यामुळे भाजपाचे आम दार इतर आमदारांबरोबर भिडले. विधानसभेचे अध्यक्ष अब्दुल रहीम राथेर यांच्या निर्देशनानुसार तीन आमदारांना वेलमधून बाहेर काढण्यात आले. जम्मू-काश्मीरला पूर्वीप्रमाणे विशेष राज्याचा दर्जा देण्याच्या ठरावावरून विधानसभेत बुधव-ारी जोरदार खडाजंगी झाली. अतिशय गोंधळात पूर्वीप्रमाणे जम्मू-काश्मीरला विशेष राज्याचा दर्जा देण्याचा ठराव चर्चेविना मंजूर करण्यात आला. मात्र, भाजपा सदस्यांनी या वेळी गोंधळ घालून ठरावाच्या प्रती सभागृहात फाडून टाकल्या आणि अध्यक्षांविरोधात घोषणाबाजी केली. बुधवारी वादळी चर्चा झाल्यानंतर आज (७ नोव्हेंबर, गुरुवार) पुन्हा भाजपा आमदारांनी वेलमध्ये येऊन गोंधळ घातला. विधानसभेत हाणामारी सुरू असतानाच पीडीपीच्या वाहिद पारा, फयाज मीर आणि पिपल्स कॉन्फरन्सचे सज्जाद गनी लोन यांनी विशेष दर्जा बहाल करण्याच्या मागणीसाठी आणखी एक ठराव म ांडला. या ठरावावर शेख खुर्शीद यांचीही स्वाक्षरी आहे. हे सभागृह स्पष्टपणे कलम ३७० आणि कलम ३५ ए त्यांच्या मूळ, अपरिवर्तित स्वरूपात त्वरित पुनर्संचयित करण्याची मागणी करते आणि जम्मू आणि काश्मीर पुनर्रचना कायदा, २०१९ द्वारे लागू केलेले सर्व बदल मागे घेण्याची मागणी करते. आम्ही भारत सरकारला विनंती करतो की या कायद्याचा आदर करावा. जम्मू आणि काश्म ीरची वेगळी ओळख, संस्कृती आणि राजकीय स्वायत्तता जपण्याच्या उद्देशाने सर्व विशेष तरतुदी आणि हमी पुनर्संचयित करा, असं या ठरावात नमूद होतं.

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
शुक्रवार दि. ८ नोव्हेंबर २०२४


## संपादकीय....

### केंद्राचे धोरण

दहशतवादी आणि त्यांच्या परिसंस्थेशी लढण्यासाठी सरकार लवकरच राष्ट्रीय दहशतवाद विरोधी धोरण आखणार असल्याचे अमित शहा यांनी सांगितले. कायदा आणि सुव्यवस्था हा राज्या-राज्यांचा विषय आहे. राज्यांना भौगोलिक सीमा आणि घटनात्मक मर्यादा आहेत, परंतु दहशतवाद्यांना यापैकी कोणत्याही मर्यादा नसतात. म्हणून केंद्र आणि राज्याच्या सर्व सुरक्षा यंत्रणांना समन्वयाने काम केले पाहिजे. त्यासाठी संयुक्त धोरण आखणे आवश्यक आहे. परिषदेत अमित शहा यांनी राज्य पोलीस दलाच्या प्रतिनिधींना आवश्यक त्या सूचना करताना राज्यांच्या पोलीस प्रमुखांना पोलीस ठाण्याच्या पातळीपर्यंत समन्वय निर्माण करण्यास आणि दहशतवादाविरुद्ध मजबूत साखळी उभी करण्यास सांगितले. या वेळी त्यांनी परदेशातील दहशतवादी प्रकरणांचा छडा लावण्यासाठी 'एनआयए'ची कार्यकक्षा वाढवण्यात येणार असल्याचे म्हटले आहे. दहशतवादी तसेच नक्षलवाद्यांना मिळणारा निधी रोखण्यासाठी २५ कलमी एकात्मिक योजना तयार करण्यात आली असल्याची माहिती या वेळी शहा यांनी दिली. नरेंद्र मोदी सरकार देशातील दहशतवाद समूळ नष्ट करण्यासाठी आणि त्याविरोधात ठोस रणनीती घेऊन पुढे जाण्यासाठी कटिबद्ध असल्याचे केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी नुकतेच सांगितले. दहशतवादाला कोणतीही प्रादेशिक सीमा नसते. केंद्र आणि राज्यामध्ये संयुक्त धोरण आखून गुप्तचर माहिती एकमेकांपर्यंत पोहोचवण्याची गरज आहे. राष्ट्रीय तपास संस्थेने (एनआयए) आयोजित केलेली दोन दिवसीय दहशतवादविरोधी परिषद गुरुवारी सुरू झाली. तंत्रज्ञानाशी संबंधित आव्हाने आणि संधी, आंतरराष्ट्रीय कायदेशीर सहकार्य आणि भारतातील दहशतवादाचा मुकाबला करण्यासाठी आवश्यक धोरणांवर या परिषदेत प्रामुख्याने चर्चा होणार आहे. तसेच भारताच्या सुरक्षा व्यवस्थेला अधिक बळकटी देण्याच्या दृष्टिकोनातून विचारमंथन होईल. त्याचबरोबर दहशतवादाविरुद्ध एकत्रित कारवाई करण्यासाठी विविध तपास संस्थांमध्ये समन्वय साधणे तसेच भविष्यातील धोरण तयार करण्यासाठी ठोस माहिती सादर करणे हे या दहशतवादविरोधी परिषदेचे मुख्य लक्ष आहे.

## इंदापूर, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा अधिकृत जाहीरनामा




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी/अतुल सोनकांबळे : प्रदेश प्रवक्ते शशिकांत तरंगे यांनी घोषित केला. इंदापूर विधानसभेचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उमेदवार श्री दत्तात्रय भरणे मामा यांच्या माध्यमातून इंदापूर तालुक्यामध्ये विविध योजना युवकांसाठी बेरोजगारी दूर करण्यासाठी जंक्शन येथील एमआयडीसी मोठमोठे प्रकल्प उभे करणे, शेतकऱ्यांसाठी कोल्ड स्टोरेजच्या निर्मिती करणे, महिलांसाठी प्रत्येक गावात महिला अस्मिता भवन उभे करणे, विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक गावात अभ्यासिका उभी करणे,खेळाडूंसाठी क्रीडा महोत्सवाचे आयोजन करणे,आरोग्याच्या दृष्टीने प्रत्येक गावामध्ये आरोग्य शिबिरे उभे करणे, यासह महाराष्ट्र सरकारच्या सर्व योजना जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी विविध उपक्रम राबवणार असल्याचे जाहीरनाम्यामध्ये प्रसिद्ध केले.यावेळी हनुमंतराव कोकाटे तालुकाध्यक्ष,लतीफ तांबोळी पक्षनिरीक्षक इंदापूर, श्रीमंत ढोले सर,माऊली वाघमोडे भारतीय जनता पार्टी नेते, राजू जठार संघटक भारतीय जनता पार्टी यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रसिद्ध करण्यात आला..

# मुन्नाभाई नंदागवळी : प्रेरणादायी आदर्श बहुआयामी व्यक्तिमत्त्व...!

प्रस्तावना :

समाजात अशी काही व्यक्तीमत्व असतात, ज्यांची कार्यक्षमता, सृजनशीलता आणि विधारशक्ती समाजाच्या विविध अंगांवर अमिट छाप सोडतात. प्रत्येक समाजात काही व्यक्तिमत्त्व अशी असतात, ज्यांच्या कर्तृत्वाने संपूर्ण समाजाला प्रेरणा मिळते आणि समाजाच्या प्रगतीत महत्वपूर्ण योगदान होते. मुन्नाभाई नंदागवळी हे असेच एक अद्वितीय, अनन्यसाधारण आणि बहुआयामी व्यक्तिमत्त्व आहेत. ज्यांनी आपल्या काव्यलेखन, साहित्यिक योगदान, नाट्यलेखन, समाजाच्या प्रत्येक क्षेत्रात काम करत पत्रकारिता आणि समाजसेवेच्या माध्यमातून समाजावर आपली अनमोल छाप मनातून मांडली आहे. आमच्या कुणी लेखक, समीक्षक, संशोधक, नाट्यलेखक, कलाकार, पत्रकार, निवेदक आणि समुपदेशक अशा विविध भूमिकांमधून त्यांनी केवळ स्वतःचीच गहन ओळख निर्माण केली नाही, तर समाजावरही प्रभाव पाडला आहे. त्यांच्या या बहुआयामी योगदानातून समाजाला प्रेरणा घेता आली आहे. ग्रामीण भागात दिशा मिळाली त्यांच्या आहे. आणि अनेकांना भूयर्यामध्ये समाजातील जीवनातील संघर्ष, आणि मानवी भावभावनांचे प्रभावी चित्रण आढळते. या सर्वामुळे मुन्नाभाई नंदागवळी यांचे जीवनकार्य आणि समाजाच्या सांस्कृतिक, साहित्यिक जीवन आणि सामाजिक जडणघडणीत मोलाचे योगदान लाभले आहे.

मुन्नाभाई नंदागवळी यांचे कार्य केवळ साहित्यापुरते मर्यादित नसून त्यांच्या समर्पणातून अनेक माणसांना जीवनात नवी दिशा व वाटचाल मिळाली आहे. ते एक असे व्यक्तीमत्व आहेत, ज्यांनी आपल्या विविध अंगांनी समाजाचे कल्याण साधले आहे. त्यांच्या या असामान्य योगदानामुळे ते मराठी साहित्य आणि समाजसेवेमध्ये एक अनोखा दिपस्तंभ ठरले अहित. ज्याचा प्रकाश सतत समाजासाठी प्रेरणादायी ठरतो.

**अष्टपैलू व्यक्तीमत्त्व : मुन्नाभाई नंदागवळी**

हे कवी लेखक, समीक्षक, संशोधक, नाट्यलेखक, कलाकार, पत्रकार, निवेदक व समुपदेशक अशा त्यांनी समर्थपणे विविध भूमिका मुख्ययोग एक सिध्दहस्त पार पाडल्या आहेत. सिध्दहस्त कवी आणि लेखक म्हणून प्रसिद्ध असून ओळखले जातात. त्यांच्या कवितांत ग्रामीण जीवनाचे सूक्ष्म आणि संवेदनशील चित्रण दिसून येते. समाजातील अन्याय, विषमता, शोषण, आणि मानवी भावनांचे गहन विश्लेषण यांच्या लेखणीतून प्रभावीपणे समोर येते. त्यांची नाट्यलेखक म्हणून ओळ्ख विशेष आहे. त्यांनी लिहिलेल्या नाटकांमध्ये समाजातील समस्या आणि संघपाधि जिवंत चित्रण केल आहे. एक उत्तम रंगकर्मी म्हणून त्यांनी अनेक नाटकांतून आपली अभिनय कला सिद्ध केली आहे. तसेच त्यांचे कार्य पत्रकार म्हणूनही उल्लेखनीय आहे. त्यांनी विविध राजकीय व सामाजिक विषयावर निर्भीडपणे लेखन आहे. एक उत्तम समुपदेशक देखील आहेत. त्यांनी अनेकांना जीवनात योग्य दिशा दाखवली आहे. त्यांच्या मार्गदर्शन, समीक्षक म्हणून त्यांनी अनेक साहित्यिक कृतिचे सखोल विश्लेषण केले आहे. संशोधनाच्या क्षेत्रातही त्यांचे योगदान मोलाचे आहे. विशेषतः ग्रामीण आणि लोककला यांच्या अभ्यासात त्यांनी एक नवा दृष्टिकोन मांडला आहे. अशा नानाविध भूमिका पार पाडण्याचे कसब डॉ.बाबासाहेब आंबेडकर या महामानवामुळेच शक्य केलेले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर आहे असे त्यांचे मत आहे. ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आपले प्रेरणास्त्रोत मानतात. त्यांच्या जीवनावर डॉ. आंबेडकर यांच्या विचारांचा प्रगाढ प्रभाव दिसतो. त्यांचा लेखनप्रवास देखील त्यांच्या विचारांशी समांतर आहे. त्यांनी विविध प्रकारच्या लेखांद्वारे समाजातील असमानता, जातीयता आणि अन्यायाविरुध्द आवाज उठवला आहे. आंबेडकरांच्या विचारसरणीचा प्रचार व प्रसार करण्यासाठी त्यांनी अनेक शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रात महत्त्वाची सामाजिक भूमिका बजावली आहे. त्यांच्या लिखाणात आंबेडकरांच्या शिक्षण, समता, न्याय, बंधूता प्राधान्याने दिसत असते. न्यायाच्या तत्वज्ञानाला त्यांचे लेख समाजातील प्रबोधनासाठी खूपच महत्वपूर्ण ठरले आहेत. विशेषतः म्हणजे आंबेडकरवादी विचारधारेच्या संदर्भात त्यांनी केलेले लेखन विचारांना व्यापकपणे नवे रूप देते आहे. असे त्यांच्या विचारसरणीने समाजात परिवर्तन घडवण्याचा प्रयत्न होत आहे.

**जीवन परिचय**

मुन्नाभाई अंजिरा रेवचंद नंदागवळी हे मराठी कला भाणि समाजसेवेत अनन्यसाधारण योगदान बहुमुखी व्यक्तीमत्व अहित. जन्म गोंदिया जिल्ह्यातील अर्जुनीमोरगाव तालुक्यातील येरंडी या गावात झाला. त्यांच्या जन्म सर्वसाधारण ग्रामीण कुटुंबात झाला. त्यांचे वडील रेवचंद मारोती नंदागवळी व आई अंजिरा यांच्या पोटी झाला. तसेच एक मोठे भाऊ संगम नंदागवळी असून असे छोटे परिवारात वाढत आहेत.

त्यांनी आपल्या जीवनात महात्मा तथागत गौतम बुद्ध, राष्ट्रपिता महात्मा फुले, छत्रपती शिवाजी महाराज, सावित्रीबाई फुले, शाहू महाराज, डॉ बाबासाहेब आंबेडकर व रमाबाई आंबेडकर यांना आदर्श मानून साहित्य, कला, समाज जीवनात अलौकिक वेगळी स्वतः ची ओळख निर्माण केली.

**शिक्षण**

मुन्नाभाई अंजिरा रेवचंद नदांगवळी यांचे शिक्षण त्यांच्या जीवनाच्या विविध टप्प्यावर महत्वपूर्ण ठरले आहे. ग्रामीण भागात वाढलेले असल्यामुळे त्यांनी आपले प्राथमिक शिक्षण गावातीलच जिल्हा परिषद शाळेत घेतले. शिक्षणाच्या सुरुवातीपासूनच त्यांची साहित्य आणि कलेविषयी असलेली आवड स्पष्टपणे दिसून येत आहे. त्यांच्यातील साहित्यिक आणि सांस्कृतिक क्षमतांचा विकास झालेला दिसतो. त्यांनी कविता नाटक आणि विविध सांस्कृतिक, सामाजिक कार्यक्रमांमध्ये भाग घेण्यास सुरुवात केली, ज्यामुळे त्यांना त्यांच्या सृजनशीलतेचा योग्य वाव मिळाला.

मुन्नाभाई अंजिरा रेवचंद नंदागवळी हे मराठी साहित्य भाषेतील आदर्श व्यक्तीमत्व आहेत. त्यांची उच्चविद्याविभूषित अशी शैक्षणिक पात्रता आहे. त्यांनी बी.ए. नाशिक विद्यापीठ, नाशीक मधून तर एम.ए मराठी व आंबेडकर विचारधारा या विषयातून प्रथम मेरिट गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली येथून पूर्ण केले आहे. गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली येथे आंबेडकरवादी कवितेचा सामाजिक, सांस्कृतिक व भाषिक अभ्यास या शीर्षकांतर्गत पीएच.डी. संशोधन करीत आहेत. विद्यापीठातील आंबेडकर विचारधारा या अभ्यास मंडळाचे पदव्युत्तर विभागातून सदस्य म्हणून आहेत.

मुन्नाभाई अंजिरा रेवचंद नंदागवळी केवल शैक्षणीक नव्हे तर व्यावसायीक अहर्ता फारच व्यापक आहे. विविध अभ्यासक्रमांनी त्यांचे गुणसंपन्न दिसतात. त्यांनी मराठी व सामाजिक शास्त्र या विषयातू गोंडवाना विदयापीठ गडचिरोली येथून बी. एड. केले आहे. त्यांनी महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद पुणे येथून डी.टी.एड. केले आहे. तसेच अखिल भारतीय गंधर्व महाविद्यालय मंडळ, मुंबईतून संगीत व कला यांचे प्रवेशिका शिक्षण पूर्ण केले आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ नागपूर येथे पत्रकारिता अभ्यासक्रमाचे शिक्षण करत आहेत. तसेच नागपूर मत्स्य विज्ञान विद्यापीठ येथून पशुवैद्यकीय पदविका व कृषी पदविका असाही शिक्षण घेतला आहे. अशाप्रकारचे शिक्षण घेऊन ते गेल्या सात वर्षापासून अध्यापनाचे कार्य उत्कृष्ट व उपक्रमशील अद्यापक म्हणून करत आहेत.

**सामाजिक क्षेत्रातील योगदान**

मुन्नाभाई अंजिरा रेवचंद नंदागवळी हे केवळ साहित्यिक आणि कलाकार नाहीत, तर त्यांनी सामाजिक परिवर्तनाच्या दिशेने महत्वपूर्ण योगदान दिले आहे. त्यांच्या कार्यामध्ये खालील मुद्दे समाविष्ट आहेत.

**सामाजिक यांची जागरूकता**

मुन्नाभाई अंजिरा रेव्चंद नंदागवळी समाजातील विविध समस्यांवर जागरुकता, निर्माण करण्यासाठी, लेखन, नाटकं आणि सार्वजनिक कार्यक्रमांचा उपयोग केला त्यांच्या कार्यामुळे अनेकांना सामाजिक समस्यांची जाणीव झाली.

**अंधश्रद्धा निर्मूलन आणि अंधश्रध्देवर**

मुन्नाभाई मंजिरा रेवचंद नंदागवळी यांनी भाष्य केले आहे. त्यांनी लोकांना विज्ञानाचा दृष्टिकोनातून विचार करण्यास प्रवृत्त केले आणि अंधश्रध्दा दूर करण्यासाठी जनजागृत केले.

**शैक्षणिक योगदान**

त्यांनी ग्रामीण भागातील. मुलांसाठी शिक्षणाची महत्व सांगितली आहे. अनेक त्यांनी गरीब आणि मागासलेल्या समुदायांमध्ये शिक्षणाच्या प्रसारासाठी उपक्रम राबवले आहेत. त्यांनी अनेक विद्यार्थ्यांना वेळोवेळी सखोल मार्गदर्शन करुन स्पर्धा परीक्षा यावरही नेहमी पुढे जायला मार्गदर्शन केले.

**सांस्कृतिक संर्वधन**

सांस्कृतिक कार्यक्रमाच्या माध्यमातून त्यांनी स्थानिक लोककला आणि परंपरा जतन करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या लेखनाने स्थानिक कलाकरांना अभिनय मंच व वाव मिळवून दिला आहे.

**समुदाय विकास**

गावातील विकासासाठी त्यांनी अनेक कार्यक्रम व उपक्रम राबवले आहेत. ज्यामध्ये लोकांच्या समस्यांवर लक्ष केंद्रित केले गेले आहे. सामान्य माणसांच्या लहान मोठ्या समस्या ते सहज सोडवून त्या नागरिकांच्या चेहऱ्यावर हास्य फूलविण्याचे कामही करित आहेत.

**साहित्यिक क्षेत्रातील योगदान**

कवी तथा लेखक म्हणून त्यांनी ग्रामीण जीवनाचे भावनात्मक चित्रण केले आहे. त्यांच्या कवितांमध्ये विचारांची गहनता आणि साधेपणाची जादू आहे. वैचारीक कविता आणि लहान कविता ही त्यांच्या कवितांची तमाम महाराष्ट्राला दांडगा परिचय आहे. नाट्यलेखनातही त्यांनी समाजातील अन्याय, अनिष्ट रुढी, चालीरिती यावर प्रहार केला, विशिष्ट समाजावर होणारा अमाणूष अत्याचार व समस्या प्रभावीपणे मांडल्या आहेत. त्यांनी अनेक कविता लिहिल्या असून पळसफूलांचा धम्मसोहळा हा काव्यसंग्रह प्रकाशित आहे. आदिवासी बोलीतील लघूप्रेमकथा, वैचारिक लेख, प्रबोधनात्मक विचाराचे लेख आदी अनेक लेख प्रकाशित व प्रसिद्ध असून याचा समाजावर चांगला प्रभाव पडलेला दिसतो आहे. उद्धवस्त ही नाटक खैरलांजी या प्रकरणावर आधारित आहे. अनेक एकांकिका लिहून सादरीकरण केले, पथनाट्य लिहून सादरीकरण केले. अशा प्रकारे जागृकता करित आहेत.

**प्राप्त पुरस्कार व सन्मान**

मुन्नाभाई अंजिरा रेवचंद नंदागवळी यांनी आपल्या साहित्यिक आणि सामाजिक कार्यामुळे अनेक पुरस्कार आणि मानसन्मान प्राप्त केली आहेत. त्यांच्या कार्यकर्तृत्वामुळे त्यांना मिळालेल्या पुरस्कारांनी व सन्मानांनी त्यांना ख्यातनाम आंबेडकरवादी साहित्यिक, समाजसुधारक तसेच कवी म्हणून ओळखले जातात. त्यांनी केलेल्या साहित्यिक कार्याबद्दल त्यांना अनेक प्रतिष्ठित पुरस्कार मिळाले आहेत.

**त्यांना मिळालेले काही नामांकित प्रमुख पुरस्कार**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय फेलोशीप राष्ट्रीय सन्मान, नवी दिल्ली



साहित्य सागर पुरस्कार नागपूर

पश्चिम विभाग महाराष्ट्र सांस्कृतिक केंद्र उदयपूर

कोरोना योद्धा पुरस्कार, पत्रकार संघ गोंदिया

संविधान मित्र पुरस्कार गोंदिया

संपादकीय - लोकमत शोध बातमीदार

संपादकीय - देशीन्नती शोध पत्रकार

इंडियन आयडॉल युवा आयकान पुरस्कार

प्रेरणा पुरस्कार सातारा

मुन्नाभाई अंजिरा रेवचंद नंदागवळी यांच्या प्राप्त पुरस्कार व सन्मानमुळे समाजाच्या व्यक्तीसाठी व देशाच्या युवकांसाठी प्रेरणादायी ठरणार आहेत. त्यांच्या कार्यामुळे समाजाला एक प्रेरणा मिळेल हे खात्रीशीर आहे.

**पत्रकारिता क्षेत्रातील योगदान**

मुन्नाभाई नंदागवळी यांनी ग्रामीण भागापासून पत्रकारिता करायला सुरुवात केली. त्यांनी वयाच्या २० वर्षापासून आतापर्यंत लोकमत, देशोन्नती, बहुजन समाचार, युवाराष्ट्र दर्शन, विदर्भाचा राखणदार, पुण्यनगरी, बहुजन सौरभ, रिध्दी सिध्दी पत्रिका, सकाळ, नवराष्ट्र आदी वृत्तपत्र यामध्ये आपल्या बातमीने अनेक सामाजिक समस्या सोडविण्यासाठी आहेत. त्यांच्या बातमी लेखनाचे अनेक रसिक आहेत. सध्या ते लोकमत या वृत्तपत्रात गेल्या नऊ वर्षापासून काम करीत आहेत.

**निष्कर्ष**

मुन्नाभाई अंजिरा रेवचंद नंदागवळी यांचे बहुआयामी व्यक्तीमत्व हे सृजनशीलतेचा आणि सामाजिक जागरुकतेचा आदर्श असा मुर्तीमंत उदाहरण आहे. त्यांचे सामाजिक योगदान हे समाजाच्या सर्व स्तरावर प्रभावी ठरले आहे. त्यांच्या कार्यामुळे त्यांनी समाजासह देशापुढे आदर्श निर्माण केला आहे. साहित्य, कला आणि समाजसेवेच्या क्षेत्रात त्यांनी केलेले कार्य हे प्रेरणा देणारे आहे. त्यांच्या कार्यामुळे त्यांनी समाजात सकारात्मक बदल घडवून आणले आहेत. पत्रकारितेच्या क्षेत्रात स्वतःच्या कार्य कुशलतेने एक स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. आणि आजच्या पिढीसाठी आदर्श ठरले आहेत. त्यांच्या जीवनातील साधेपण आणि समर्पण ही त्यांच्या व्यक्तीमत्वाची खरी ताकद आहे. त्यांनी एक आदर्श निर्माण केला आहे. जोआजच्या तरुण पिढीसाठी प्रेरणादायी ठरतो.

**- कु. प्रणाली बन्सोड,**
**एन. एम. डी. महाविद्यालय,**
**गोंदिया**

## तब्बल २५ वर्षांनी विद्यार्थी आणि गुरुजन यांचा ऋणानुबंध स्नेहमेळावा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे/प्रतिनीधी : पुणे महानगरपालिकेचे विद्यानिकेतन क्र. ५, बोपोडी या विद्यालयातील इयत्ता ७ वी चे १९९९ च्या बॅच चे सर्व माजी विद्यार्थी यांनी तब्बल २५ वर्षांनी विद्यार्थी आणि गुरुजन यांचा ऋणानुबंध स्नेहमेळावा आयोजित केला होता.



या कार्यक्रमाच्या निमित्ताने काही रक्कम एक सामाजिक कर्तव्य म्हणून सर्व माजी विद्यार्थी यांनी दिपावली निमित्त अनिकेत सेवाभावी संस्था, मुळशी, पुणे. या ठिकाणी विशेष मुलांना जेवण (अन्नदान), दिवाळीचे फराळ, मिठाई व गरजोपयोगी वस्तूंचे वाटप करून एक आगळीवेगळी आणि अर्थपूर्ण अशी दिपावली साजरी केली.

अनाथ आश्रमास दान करण्याचा निर्णय घेऊन मानवतेचे दर्शन घडवून एक नवीन असा आदर्श माजी विद्यार्थ्यांनी जगासमोर ठेवला आहे. आपण आपली ओंजळ ही नेहमी गरज असेल तिथे सामाजिक बांधिलकी म्हणून रिक्त करत जावी ती पुन्हा पुन्हा भरण्यासाठीच. परमात्मा ती ओंजळ पुन्हा कैकपटीने भरत असतो आपले आयुष्य सुखाने, आनंदाने आणि समाधानाने बहरण्यासाठी. शिक्षणाच्या पलीकडे जाऊन मानवी मूल्यांचा अमूल्य आणि महत्त्वाचा असा गृहपाठ सर्व विद्यार्थ्यांनी गिरवला आहे.

कार्यक्रमाला विद्यानिकेतनचे क्र. ५ चे सर्व माजी विद्यार्थी यांच्यातर्फे नेतृत्व केले साधना तांबेपाटील, राजू कोरे, स्वप्नांजली स्वामी हे विद्यार्थी यांनी आणि यांसोबत त्यांचे गुरुवर्य मा.श्री.ह.भ.प.कि.पा. चौधरी सर, मा. श्री शिंपी सर हे उपस्थित होते.

## सिंदखेडराजा विधानसभा मतदार संघातून तरूण चेहरा असलेल्या मनोज कायंदेना मतदारांचा प्रतिसाद

**दैनिक यश सिध्दी न्युज नेटवर्क**

बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी /राहुल साबळे : सिंदखेडराजा विधानसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार मनोज कायंदे यांना ग्रामीण व शहरी भागात जनतेकडून पाठींबा मिळत आहे. जनतेकडून मिळत असणाऱ्या पाठिंब्यामुळे माझे मनोधैर्य वाढले आहे. निवडणुकीत जनतेच्या या ताकदीमूळे आपला विजय नक्कीच आहे. या विधानसभा मतदारसंघातील अनेक प्रश्न प्रलंबित आहेत.



पायाभूत सुविधांचा अभाव आहे. पाण्याच्या असुविधा वाड्यावस्त्यांवर आहेत. या पायाभूत सुविधा आपल्याला समाधान करायचे आहेत. रोजगाराची प्रचंड समस्या आहे ती सोडवायची आहे. रोजगारावर निर्मिती वर विशेष भर देणार आहे.मतदार संघात एक ही एम आय डीसी . उद्योग धंदे नाही.माँ जिजाऊ साहेबांचा मतदारसंघ विकासापासून दुर राहलेला आहे सिंदखेडराजा विधानसभा मतदार संघ विकासाच्या प्रक्रियेत केंद्रबिंदू असला पाहिजे. सिंदखेडराजा विधानसभा मतदार संघाचा कायापालट करण्याचे अभिवाचन देतो. असे वक्तव्य महायुतीचे उमेदवार मनोज कायंदे यांनी दैनिक यश सिध्दी न्युज सी बोलताना सांगितले.

मनोज कायंदे हे २४, सिंदखेडराजा विधानसभा निवडणुकीसाठी महायुतीचे उमेदवार म्हणून निवडणुकीला सामोरे जात आहेत. त्यांना गावोगावी चांगला प्रतिसाद मिळत आहे. लोकांशी मनोज कायंदे हे संवाद साधत आहेत. अनेक जण विश्वासाने स्वत:हून त्यांना भेटत आहेत, समस्या मांडत आहेत तसेच त्यांना समर्थन ही देत आहेत. मनोज कायंदे यांच्यासह महायुतीचे कार्यकर्ते प्रचार करीत असतांना प्रचंड प्रतिसाद मिळताना दिसत आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## थोडक्यात...

### बस स्थानकात चार्जिंगला लावलेला मोबाईल लंपास

सोलापूर, (प्रतिनिधी) : सोलापूर बस स्थानकातील विश्रांतीगृह येथे फिर्यादी शिवानंद खंडू भोसीकर (वय-३२,रा. नांदेड) यांनी तेथे चार्जिंगला मोबाईल लावलेला असताना अज्ञात चोरट्याने चोरून नेला आहे. ही घटना ५ नोव्हेंबर रोजी मध्यरात्री घडली.याप्रकरणी शिवानंद भोसीकर यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल बाचावार हे करीत आहे.

### रामलाल चौकातून दुचाकी लंपास

सोलापूर, (प्रतिनिधी) : रामलाल चौक येथे फिर्यादी शहाजहान अब्दुल पटेल (वय-५५,रा.मुस्लिम पाच्छा पेठ) यांची दुचाकी क्रमांक एमएच.१३. सीझेड.१४५१ यांनी पार्क करून ठेवलेली असताना अज्ञात चोरट्याने ती दुचाकी चोरून नेली आहे.ही घटना ४ नोव्हेंबर रोजी रात्री नऊ ते दहा वाजण्याच्या दरम्यान रामलाल चौक येथे घडली.या प्रकरणी शहाजहान पटेल यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून, त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पोलीस नाईक ढोबळे हे करीत आहेत.

### चहा पीत असताना तरुणाचा मोबाईल पळवला

सोलापूर, (प्रतिनिधी) : डफरीन चौक येथे क्रूजर गाडी पार्क करून फिर्यादी महेश पतंगराव बडियर (वय-२८,रा.जुना विडी घरकुल) हे चहा प्यायला गेल्यानंतर अज्ञात चोरट्याने त्यांचा मोबाईल चोरून नेला आहे.ही घटना १ नोव्हेंबर रोजी डफरीन चौक येथे सायंकाळी सात वाजण्याच्या दरम्यान घडली.या प्रकरणी महेश बडियर यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून, त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार चव्हाण हे करीत आहेत.

# आप्पासाहेब अनेक जण घेऊन आलेत तिकडे काही ठेवता की नाही? का सगळंच घेऊन येता? : अजित पवार

## राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा जाहीरनामा प्रसिद्ध; सर्व घटकांना न्याय देण्याचा प्रयत्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर/प्रतिनिधी अतुल सोनकांबळे

इंदापूर : महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत आज निमगाव केतकी येथील जाहीर सभेत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेचे आप्पासाहेब जगदाळे यांनी आज अजित पवार गटात प्रवेश केला. यावेळी ते बोलत होते. आताचा पक्ष प्रवेश बघून जयंत पाटील यांना वाटलं असेल आप्पासाहेब जगदाळे यांना उमेदवारी दिली असती तर बरं झालं असतं असेही अजित पवार म्हणाले. आप्पासाहेब अनेक जण घेऊन आले आहेत. अजून घेऊन येणार असे सांगत आहेत तिकडे काही ठेवता की नाही? का सगळंच घेऊन येता? असा सवालही अजित पवार यांनी केला.





सत्तेचा वापर हा सर्वसामान्य जनतेच्या हितासाठी करायचा असतो.

मिळालेल्या सत्तेचा वापर हा सर्वसामान्य जनतेच्या हितासाठी करायचा असतो ही शिकवण आम्हाला मिळाली असल्याचे अजित पवार म्हणाले. चांगल काम करणे हे आपलं कर्तव्य असल्याचे अजित पवार म्हणाले. आम्हीपण चांगली चांगली माणस पाहत असतो. पक्ष वाढीसाठी चांगल्या माणसांची गरज असते असेही अजित पवार म्हणाले. कोणतंही काम तीडस नेण्याचं काम आप्पासाहेब जगदाळे यांनी केल्याचे अजित पवार म्हणाले. ते शिक्षण संस्था चांगल्या चालवतात असेही अजित पवार म्हणाले. आप्पासाहेब जगदाळे यांच्या येण्यानं आपली ताकद वाढली असल्याचे अजित पवार यावेळी म्हणाले, समोरचे उमदेवार तुल्यबळ आहेत, असं समजून आपले आखाडे बांधायचे असतात असेही अजित पवार यावेळी म्हणाले.

आम्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा जाहीरनामा प्रसिद्ध केला आहे. यामध्ये सर्व घटकांना न्याय देण्याचा प्रयत्न केल्याची माहिती अजित पवार यांनी दिली. मी कधीही जातीभेद करत नाही. मी बोलतो तसं वागतो असेही अजित पवार म्हणाले. पुढे जायचं असेल तर सर्वांना सोबत घेऊन जावं लागेल असेही अजित पवार यावेळी म्हणाले. आपण शिव शाहू फुले आंबेडकरांचा आदर्श घेतो, त्यावेळी जनता देखील विचार करत असते की बे लोक बोलतो तसे वागतात का असे ते म्हणाले.

# चंद्रभागा नदीपात्रात जलवाहतूकीस प्रवाशी संख्या मर्यादेसह सुरक्षेच्या साधनांचा वापर अनिवार्य

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : कार्तिकी यात्रेच्या अनुषंगाने चंद्रभागा नदीपात्रात जलवाहतूकीदरम्यान प्रवाशी संख्या निश्चित ठेवून वाहतूक करण्यास व सुरक्षेच्या साधनांचा प्रवाशी व चालक यांनी अनिवार्यपणे वापर करण्यास तसेच सूर्योदयापूर्वी व सूर्योदयानंतर होडीतून प्रवास करण्यास भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ (२) अन्वये आदेश उपविभागीय दंडाधिकारी सचिन इथापे यांनी जारी केले

### उपविभागीय दंडाधिकारी इथापे यांनी आदेश केले जारी

कार्तिकी यात्रा सोहळा कालावधीत सुमारे ५ ते ६ लाख भाविक श्री. विठ्ठल रुक्मिणीच्या दर्शनासाठी व चंद्रभागा स्नानासाठी पंढरपूरला येतात. कार्तिकी एकादशीला येणारे भाविक चंद्रभागा नदीस्नान करून श्री विठ्ठल रुक्मिणीच्या दर्शनाला जातात. भाविक नदीपात्रातून जलवाहतूक करून विष्णुपद, इस्कॉन मंदिर येथे दर्शनसाठी जातात. होडीचालक क्षमतेपेक्षा जास्त प्रवाशी होडीत भरून वाहतूक करीत असल्याचे वारंवार निदर्शनास आले असून, नदीपात्रात अनुचित प्रकार घडून दुर्घटना होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याचे तसेच प्रवाशांकडून अवाजवी पैसे घेतलेच्या तक्रारी वारंवार प्राप्त होत असल्याने प्रशासनाकडून यात्रा कालावधीतील होडयांचे नियमन व वाहतूक योग्य रितीने होणेकामी आदेश जारी करण्यात आले आहेत.

तसेच होडीतून वाहतूक करतेवेळी सुरक्षा कोट घालणेत यावा, क्षमतेपेक्षा जास्त भाविक होडीत बसवू नयेत, सूर्योदयापूर्वी व सूर्योदयानंतर होडीतून प्रवास करू नये. नियमित करून दिलेल्या वेळेतच जलवाहतूक करावी. सदरचा आदेश दि. १५ नोव्हेंबर २०२४ पर्यंत रात्री ११.५९ पर्यंत लागू राहील. सदरच्या आदेशाचे उल्लंघन झाल्यास संबंधित कायदेशीर कारवाईस पात्र राहील असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

# माढयात शिवाजी कांबळे यांनी अपक्ष उमेदवार रणजित शिंदे यांना दिला पाठिंबा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

माढा : माजी जिल्हा परिषद सदस्य शिवाजी कांबळे यांनी मोहिते पाटील यांना धक्का देत. माढा विधानसभेचे अपक्ष उमेदवार रणजीत सिंह शिंदे यांना पाठिंबा दिला आहे



शिवाजी कांबळे यांचे अनेक वर्षापासून बबन दादा यांचे अतिशय जवळचे संबंध होते पण काही कारणामुळे त्यांचे संबंध दुरावले होते त्यामुळे ते विरोधात काम करत होते त्यांनी आपला अपक्ष म्हणून अर्ज भरला होता तो अर्ज त्यांनी माघार घेऊन माळ्याच्या विकासासाठी आपण त्यांना पाठिंबा दिला असल्याचे त्यांनी अर्ज माघारी घेतल्यानंतर सांगितले आहे.

असे असताना माढा मतदारसंघातील माजी जिल्हा परिषदेचे शिवाजी कांबळे यांनी माढा विधानसभेचे अपक्ष उमेदवार रणजीत शिंदे यांना पाठिंबा दिला आहे

# त्रिशरण फाउंडेशनची वंचितांसोबत दिवाळी साजरी, केले फराळाचे वाटप



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : त्रिशरण एन्लाइनमेंट फाउंडेशन पुणे या संस्थेच्या संस्थापिका तथा संचालिका प्रज्ञाताई वाघमारे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून दीपावली सणानिमित्त सोलापूर शहरातील गोरगरीब निराधारांना फराळाचे वाटप करण्यात आले.

सोलापुर शहराच्या कुमठा नाका परिसरातील बेघर निवारा केंद्रातील निराधारांना दिवाळी फराळाचे वाटप करण्यात आले. त्रिशरण फाउंडेशनचे पुणे विभागीय समन्वयक शितल कांबळे निवारा केंद्राचे व्यवस्थापक अशोक वाघमारे, पत्रकार अमोगसिध्द लांडगे, प्रणिता कांबळे, विकास दूत भाग्यश्री वंजारे उपस्थित होते.

तसेच बसवनगर भवानी पेठ येथील हिंदू मुस्लिम बांधवांसह चर्मकार व लोहार बांधव यांनाही फराळाचे वाटप करण्यात आले. याशिवाय सोलापूर शहराच्या होम मैदान परिसरात अनेक गोरगरीब उघड्यावरती राहतात. या गोरगरीब लोकांना त्रिशरण फाउंडेशनच्या वतीने दिवाळी फराळाचे वाटप करण्यात आले. यंदा फाउंडेशनच्या संस्थापिका प्रज्ञा वाघमारे यांच्या वाढदिवसानिमित्त गोरगरीब वंचित घटकांसोबत यंदा दिवाळी उत्सव साजरा करण्यात आला.

# सद्गुरु बहुउद्देशीय सामाजिक संस्थेची दिवाळी अनाथ आणि बेघरांसोबत साजरी

सोलापूर : दिवाळी हा सण प्रकाशपर्व म्हणून देशभरात उत्साहात साजरा केला जातो. पालकांच्या प्रेमाला पोरके झालेल्या अनाथांना आपुलकीचा हात द्यावा या उद्धेशाने फराळाचे वाटप करून त्यांनाही दिवाळीच्या आनंदात सहभागी करून घेत सोलापूर येथील सदगुरु बहुउद्देशिय सामाजिक संस्थेने शनिवार दि. २ नोव्हेंबरला निलम नगर येथील शांताई अनाथ आश्रमात मुलांसोबत दिवाळी साजरी केली.




याप्रसंगी सदगुरु बहुउद्देशिय सामाजिक संस्थेच्या अध्यक्षा भाग्यश्री वंजारे - बनसोडे, संगप्पा कांबळे व राहूल उडाणशिव यांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांना फराळाचे वाटप करण्यात आले . अध्यक्षा भाग्यश्री वंजारे - बनसोडे यांच्या या उपक्रमाबद्दल उपस्थित मान्यवरांनी कौतुक केले.

तसेच याप्रसंगी रस्त्यावरून फिरणारे तसेच सिव्हिल हॉस्पिटल समोरील अनाथांनाही यावेळी संस्थेच्या वतीने वाटप करून सामाजिक बांधिलकी जपण्यात आली. यावेळी संस्थेच्या अध्यक्षा भाग्यश्री वंजारे - बनसोडे, राजू नामन, संस्थेचे कार्याध्यक्ष तुकाराम द्यावरकोंडा आदीजण उपस्थित होते. सादर कार्यक्रमासाठी गणेश मिसाळ, मल्येश जोगळेकर आदींनी परिश्रम घेतले.

### १५९ गुन्हे नोंद; २७ वाहनांसह मुद्देमाल जप्त

### राज्य उत्पादन शुल्कचे अधीक्षक भाग्यश्री जाधव यांची माहिती

# राज्य उत्पादन शुल्कच्या भरारी पथकांच्या कारवाईत ८२ लाख २४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ आदर्श आचारसंहिता कालावधीत राज्य उत्पादन शुल्क,विभागाच्या भरारी पथकांकडून जिल्हयात अवैधरीत्या गावठी दारु निर्मिती, विक्री, वाहतूक आदी प्रकरणात कारवाई करुन १५९ गुन्हे नोंदविण्यात आले आहेत. यामध्ये ८२ लाख २४ हजार ५६७ रुपये किंमतीचा २७ वाहनांसह दारू बंदी गुन्ह्यातील मुद्देमाल जप्त करण्यात आला असल्याची माहिती राज्य उत्पादन शुल्कचे अधीक्षक भाग्यश्री जाधव यांनी दिली.





या पथकामार्फत दि.०५नोव्हेंबर २०२४ रोजी राज्य उत्पादन शुल्क निरीक्षक, व दुय्यम निरीक्षक कुर्डुवाडी पथक क्र. .१ व २ आणि ३ यांची संयुक्त गुन्हा अन्वेषण धडक कारवाई मध्ये बार्शी शेळगांव रोड ता.बार्शी येथे रात्री अवैध हातभट्टी दारू वाहतूक करणारी एक बोलेरो पीकअप वाहन क्र. एम.एच. १३डीक्यू ४१२७ यामध्ये ९०० लीटर हातभट्टी दारू सह जप्त करण्यात आले असून एकूण ८ लाख ९१ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून दोन इसमांवर कारवाई करण्यात आली आहे. तसेच घोडा तांडा, भोजाप्पा तांडा, व सोलापूर शहर परिसरात केलेल्या अवैध हातभट्टी दारू निर्मिती केंद्रावर वाहतूक करणा-या वाहनांवर केलेल्या कारवाईत ५ हजार ३०० लीटर गुळमिश्रीत रसायन ७०० लीटर हातभट्टी दारू, एक बोलेरो जीप व एक ईर्टीका कारसह १२ लाख ७७ हजार ३०० रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर कारवाईत एकुण सहा गुन्हे नोंदविण्यात आले आहेत.

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ आदर्श आचारसंहिता लागू झाल्यापासून सोलापूर जिल्हयात एकूण १५९ गुन्हे नोंदविण्यात आले असून एकुण २७ वाहनांसह रुपये ८२ लाख २४ हजार ५६७ रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे शहरी भागात बिअर शॉपीवर पिण्याची व्यवस्था करण्या-या शॉपीवर नियम भंग कारवाई नोदविण्यात आली आहे. ज्याप्रमाणे वाहन चालवण्यासाठी परवाना आवश्यक त्याप्रमाणे मद्य सेवनासाठी ही परवाना आवश्यक असतो. याची नोद घ्यावी. निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर कोणीही अवैध मद्यसेवनाच्या प्रलोभनास बळी पडू नये असे आवाहन राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

तसेच अवैध मद्यविक्री अवैध धंदे व वाहतूकी विरोधात कारवाई यापुढेही चालु राहणार असून, अवैध मद्याबाबत माहिती असल्यास टोल फ्री १८००२३३९९९९ क्रमांक अथवा व्हॉटस प क्रमांक ८४२२००११३३ या कार्यालयास माहिती दिल्यास माहिती देणाऱ्याचे नाव गुप्त ठेवले जाईल. अवैध मद्याबाबतची माहिती कळविण्याचे असे आवाहनही राज्य उत्पादन शुल्कचे अधीक्षक भाग्यश्री जाधव यांनी केले आहे.

**थोडक्यात...**

### पूर्व वैमन्यसातून मारहाण; सहा जणांवर गुन्हा

सोलापूर, (प्रतिनिधी) : मागील वर्षी झालेल्या किरकोळ भांडणाचा राग मनात धरून शिवीगाळ करत मारहाण केल्याप्रकरणी सहा जणांविरुद्ध सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना ६ नोव्हेंबर रोजी केशवनगर येथे घडली.याप्रकरणी ग्रेड पोसई.जयदेवी मोहन काळे (रा.बी न १८,रुम नं ८४ केशवनगर) यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून रेखा काळे (रा.कुंभारी गाव पारधी कॅम्प) सोनी चव्हाण,सोनू चव्हाण,निर्मला काळे,ताई चव्हाण व दीपक चव्हाण (सर्व.रा.सोलापूर) यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

या घटनेची हकीकत अशी की, फिर्यादी यांची भावजई रेखा काळे हिने मागील वर्षी झालेल्या किरकोळ भांडणाचा राग मनात धरून वरील संशयित आरोपी यांना फिर्यादी यांच्या घरी येऊन फिर्यादी यांच्या आईला हाताने मारहाण केली.त्यानंतर फिर्यादी यांच्या घरावर दगडफेक करत त्यांच्या भावास दुखापत केली.तसेच रेखा काळे हिने व तिच्यासोबत आलेल्या इतर जणांनी बेकायदेशीर जमाव जमवून फिर्यादीस दमदाटी करत दोघींना नोकरी घालवण्याची धमकी दिल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. पुढील तपास मसपोनि.जगताप या करीत आहेत.

## दुष्काळी कलंक पुसण्यासाठी जलसिंचनासाठी व इतर विकास कामांसाठी ऐतिहासिक निधी आणला : समाधान आवताडे

### चौथ्या दिवशी मंगळवेढा तालुक्यातील गावांमध्ये प्रचार दौरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : अनेक वर्षांपासून दुष्काळी तालुका असा शिक्का असणाऱ्या आपल्या मंगळवेढा तालुक्यातील दुष्काळ कायमस्वरूपी संपुष्टात यावा यासाठी महायुती सरकारच्या माध्यमातून राज्याचे मुख्यमंत्री ना.एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार यांच्या सहकार्यातून ऐतिहासिक निधी आणून अनेक वर्षांची २४ गावे उपसा सिंचन हा पाणीप्रश्न मार्गी लावण्यात आपल्या सर्वांच्या आशीर्वादाने आणि दिलेल्या संधीमुळे यश प्राप्त झाले असे उद्गार पंढरपूर-मंगळवेढा विधानसभा मतदारसंघाचे भाजपा महायुतीचे उमेदवार समाधान आवताडे यांनी व्यक्त केले आहेत. निवडणूक प्रचारार्थ आ आवताडे यांनी भाजपा व महायुती पदाधिकारी तसेच कार्यकर्ते यांच्यासमवेत चौथ्या दिवशी मंगळवेढा तालुक्यातील बालाजीनगर, कात्राळ, कर्जाळ, कागष्ट, डिकसळ, माळेवाडी, पौट, येळगी, हुलजंती या गावांमध्ये प्रचार दौरा करुन गावाकऱ्यांशी संवाद साधला.

पुढे बोलताना त्यांनी सांगितले की, तुमचा लोकप्रतिनिधी म्हणून मला अतिशय कमी कालावधी मिळाला असला तरी जनतेप्रती माझी असणारी सेवाभावी नैतिकता आणि तळमळ यांच्या जोरावर मी आपल्या मतदारसंघातील अनेक प्रश्नांना हात घालून विकासाच्या रूपाने मार्गी त्यांना पूर्ण केले आहे. विकास निधीचा हिशोब मागणाऱ्यांनी कितीही खटाटेप आणि गैरसमज निर्माण केला तरी मी त्यांच्या टिकेला गांभीर्याने न घेता तुमच्या सेवेसाठी सदैव तत्पर असेन, देशात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सामान्य जनतेच्या हिताचा विचार करुन देश चालवत आहे. अगदी त्याच पद्धतीने राज्यातील देखील येणारे सरकार हे महायुतीचे असल्यामुळे सामान्य जनतेचे सेवा-चक्र आणखी गतिमान होणार आहे. राज्यातील महिला भगिनींच्या अर्थिक सक्षमीकरणासाठी चालू असलेली मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना कोणत्याही परिस्थितीमध्ये बंद होणार नसल्याचे त्यांनी यावेळी विरोधकांना ठणकावून सांगितले. रस्ते, वीज, आरोग्य, शिक्षण, पाणी इत्यादी विकास कामांसाठी हजारो कोटींचा निधी आणला असला तरी मला आपल्या आशीर्वादाने मिळणाऱ्या या संधीचे सोने करुन याहीपेक्षा मोठ्या विकास कामांना मंजुरी आणून आपल्या मतदारसंघाला रोल मॉडेल बनवायचे आहे असे त्यांनी म्हटले आहे.

महायुती सरकारने महाराष्ट्राला विकासपथावर अग्रेसर ठेवले आहे. विकासाची हीच गंगा मतदारसंघात अखंडपणे राहावी यासाठी कमळ चिन्हासमोरील बटन दाबून महायुतीला आशीर्वाद देण्याची विनंती उमेदवार समाधान आवताडे यांनी उपस्थितांना केली. सदरवेळी जिल्हा नियोजन समिती सदस्य प्रदीप खांडेकर, जेष्ठ नेते दत्तात्रय जमदाडे, भाजपा विधानसभा अध्यक्ष राजेंद्र सुरवसे, जिल्हा संघटन सरचिटणीस शशिकांत चव्हाण, तालुकाध्यक्ष अंबादास कुलकर्णी, संचालक तानाजी काकडे, माजी संचालक विजय माने, पप्पू काकेकर, यांचेसह संबंधित गावांचे सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत आजी-माजी सदस्य, पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ व महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सिंदखेडराजा विधानसभा मतदार संघातून तरूण चेहरा असलेल्या मनोज कायंदे ना मतदारांचा प्रतिसाद...

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी /राहुल साबळे : सिंदखेडराजा विधानसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार मनोज कायंदे यांना ग्रामीण व शहरी भागात जनतेकडून पाठींबा मिळत आहे. जनतेकडून मिळत असणाऱ्या पाठिंब्यामुळे माझे मनोधैर्य वाढले आहे. निवडणुकीत जनतेच्या या ताकदीमूळे आपला विजय नक्कीच आहे. या विधानसभा मतदारसंघातील अनेक प्रश्न प्रलंबित आहेत. पायाभूत सुविधांचा अभाव आहे. पाण्याच्या असुविधा वाड्यावस्त्यांवर आहेत. या पायाभूत सुविधा आपल्याला समाधान करायचे आहेत. रोजगाराची प्रचंड समस्या आहे ती सोडवायची आहे. रोजगारावर निर्मिती वर विशेष भर देणार आहे.मतदार संघात एक ही एम आय डीसी . उद्योग धंदे नाही.माँ जिजाऊ साहेबांचा मतदारसंघ विकासापासून दुर राहलेला आहे सिंदखेडराजा विधानसभा मतदार संघ विकासाच्या प्रक्रियेत केंद्रबिंदू असला पाहिजे. सिंदखेडराजा विधानसभा मतदार संघाचा कायापालट करण्याचे अभिवाचन देतो. असे वक्तव्य



महायुतीचे उमेदवार मनोज कायंदे यांनी दैनिक यश सिध्दी न्युज सी बोलताना सांगितले.

मनोज कायंदे हे २४, सिंदखेडराजा विधानसभा निवडणुकीसाठी महायुतीचे उमेदवार म्हणून निवडणुकीला सामोरे जात आहेत. त्यांना गावोगावी चांगला प्रतिसाद मिळत आहे. लोकांशी मनोज कायंदे हे संवाद साधत आहेत. अनेक जण विश्वासाने स्वत:हून त्यांना भेटत आहेत, समस्या मांडत आहेत तसेच त्यांना समर्थन ही देत आहेत. मनोज कायंदे यांच्यासह महायुतीचे कार्यकर्ते प्रचार करीत असतांना प्रचंड प्रतिसाद मिळताना दिसत आहे

## आज बाराभाटी येथे राष्ट्रीय संगित दुय्यम खडा तमाशा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बोंडगांव देवी: राज्याच्या टोकावर असलेला जिल्हा म्हणून गोंदिया जिल्ह्याची ओळख आहे त्यात भंडारा गडचिरोली आदी जिल्ह्यासह गोंदिया जिल्हालाही झाडीपट्टीचा जिल्हा म्हणून गणण्यात येत आहे शेतीचा हंगाम संपला की दिवाळी सणापासून झाडीपट्टी मंडई उत्सवाची सुरुवात होते.

त्याच्या पार्श्वभूमीवर दिवाळीचा पाडवा झाला की मंडई निमित्त गावागावात मनोरंजनात्मक कार्यक्रमाची रेलचेल पहावयास मिळते यानिमित्ताने झाडीपट्टीतील कलावंतांना आपली कलाकृती सादर करण्याची संधी मिळत असून पाहुण्यांच्या मनोरंजनासाठी दिवस व रात्री सुद्धा मनोरंजनात्मक कार्यक्रमाची मेजवानी दिली असते याचाच भाग म्हणून अर्जुनी मोरगांव तालुक्यातील मौजा बाराभाटी येथे नवतरुण पंचशील नाट्य कला मंडळाच्या वतीने दि.०८ नोव्हेंबर रोज शुक्रवार ला दरवर्षी प्रमाणे या वर्षी सुद्धा मंडईचे आयोजन करण्यात आले आहे त्या निमित्ताने मनोरंजन म्हणून रात्रीला राष्ट्रीय संगित दुय्यम खडा तमाशा या नाट्य कला मंडळाने आयोजित केले आहे.

या सदर कार्यक्रमामध्ये गावातील काही सत्कारमुर्तीचे सत्कार करण्यात येणार आहे यामध्ये अर्जुनी मोर विधुत विभाग अभियंता इंजि. अमित शहारे, से.नि.शिक्षक बाराभाटी रविंद्र वालदे, से.नि.मुख्याध्यापक बाराभाटी अनिल कांबळे, चंद्रशेखर तिरपुडे, म.पो.बाराभाटी श्रीकांत धारगावे, म.पो.बाराभाटी आकाश नंदेश्वर, गाव माझा न्युज गोंदिया चंद्रमुणी बन्सोड, एस.एस.बि.भारत सरकार चेतन येरणे, से.नि.शिक्षण अधिकारी बाराभाटी फुलचंद नंदेश्वर, इंजि.बाराभाटी नितीन कांबळे या सर्व सत्कारमुर्तीचा सत्कार केला जाणार आहे. आणि कोणताही कार्यक्रम म्हटला की कार्यक्रमाकरिता पाहूण्याची आवश्यक असते ते असल्या शिवाय कोणताही रंगतदार होत नाही म्हणूनच मौजा बाराभाटी येथे दि.०८ नोव्हेंबर रोजी राष्ट्रीय संगित दुय्यम खडा तमाशा या तमाशाचे उद्घाटक माजी सामा. न्याय.मंत्री राजकुमार बडोले, सहउद्घाटक वंचित बहुजन आघाडी सामाजिक कार्यकर्ता दिनेश पंचभाई, अध्यक्ष जि.प.सदस्या गोंदिया रचना गहाणे, उपाध्यक्ष राष्ट्रीय अध्यक्ष संविधान सेना दिलवरभाई रामटेके, जि.प.उपाध्यक्ष गोंदिया यशवंत रणवीर, संजय गांधी जुनियर कॉलेज तेढा संजय नंदेश्वर, वंचित बहुजन आघाडी जिल्ह्याध्यक्ष गोंदिया सतिश बन्सोड, वन्यजीव मार्गदर्शक तथा सामाजिक कार्यकर्ते प्रभाकर दहिकर, उद्योगपती अर्जुनी मोर दादा फुंडे, माजी.जि.प.सदस्य गोंदिया किशोर तरोणे, पं.स.सभापती अर्जुनी मोर सविता कोडापे, कृ.उ.बा.समिती उपसभापती अर्जुनी मोर अनिल दहिवले अन्य प्रमुख पाहुणे व गावकरी मंडळी याच्या प्रमुख उपस्थितीत पार पडणार आहे. तरी वरील कार्यक्रमास जास्तीत जास्त संख्येत उपस्थितीत राहण्याचे आवाहन नवतरुण पंचशील नाट्य कला मंडळ बाराभाटी यांनी केले आहे.

## धैर्यशील मोहिते पाटील यांच्या हस्ते महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार अनिल सावंत यांच्या प्रचाराचा शुभारंभ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार अनिल सावंत यांच्या प्रचाराचा शुभारंभ माचनूर येथे धैर्यशील मोहिते पाटील यांच्या शुभहस्ते करण्यात आला.

राष्ट्रवादीकडून शरद पवार यांच्यासारख्या बुजुर्ग नेत्यांचा तुम्ही फसवलं पंढरपूर मंगळवेढ्यातील जनता आता तुम्हाला हद्दर घड्याळ शिवाय राहणार नाही अशी टीका खासदार देखील मोहिते पाटील यांनी बजेट भारतीय यांच्यावर केली मंगळा तालुक्यातील माचनूर येथे राष्ट्रवादी शरकेंद्र पवार काँग्रेसचे अधिकृत उमेदवार अनिल सावंत यांच्या प्रचाराच्या शुभारंभ मंगळवारी करण्यात आला. यावेळी ते बोलत होते.

याप्रसंगी उमेदवार अनिल सावंत यांच्यासह माझी मंत्री लक्ष्मणराव ढोबळे, राष्ट्रवादी युवती प्रदेशाध्यक्ष आरक्षणा सलगर, ज्येष्ठ नेते राहुल शहा, प्रथमेश पाटील, रविकांत पाटील, दत्तात्रय भोसले रवींद्र पाटील शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे शहराध्यक्ष रवी मुळे राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष सुभाष भोसले जिल्हा संघटक सुधीर भोसले ओबीसी महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष साधनाताई राऊत, अण्णा शिरसाट काँग्रेसचे फिरोज मुलांनी संतोष रणदिवे, श्याम गोगाव सर, यांच्यासह महाविकास आघाडीचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते

ह्यावेळी बोलताना खासदार देशील मोहिते पाटील यांनी महाग का आघाडीच्या उमेदवारीचा घोळ सांगण्याचा प्रयत्न केला. ऐनवेळी काँग्रेस पक्षाने उमेदवारी म्हणून जाहीर झालेल्या बाहेर वर आढळून टीका केली व २७ तारखेला काय झाले ठाऊक नाही पण २८ तारखेला तुम्ही फिरायला नाही राष्ट्रवादी प्रमुख शरद पवार यांच्यासारख्या बुजुर्ग नेत्यांना तुम्ही फसवत पंढरपूर मंगळवेढा की जनता हुशार आहे शरद पवार यांच्यावर प्रेम करणारी आहे २००९ सॉरी आमच्या



कुटुंबाने अनुभवले आहे त्यामुळे जनता तुम्हास अद्दल घडवल्याशिवाय राहणार नाही असा विश्वास यावेळी त्यांनी व्यक्त केला.

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे उमेदवारी अनिल सावंत यांच्या संयम आणि शिस्तीला दिलेली देणगी आहे पंढरपूर विधानसभा मतदारसंघात त्यांचा विजय निश्चित असल्याची प्रतिक्रिया ही यावेळी त्यांनी व्यक्त केली.

## पडघा विभागात मतदान जनजागृती अभियान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

भिवंडी प्रतिनिधी/मिलिंद जाधव : भिवंडी विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ साठी भिवंडी ग्रामीण (अ. ज) १३४ निवडणूक निर्णय अधिकारी मल्लिकार्जुन माने,सहायक निवडणुक निर्णय अधिकारी भाऊसाहेब अंधारे यांच्या मार्गदर्शनाखाली नुकताच भिवंडी तालुक्यातील पडघा विभागात मतदान जनजागृती अभियान राबविण्यात आला मतदान हे आपले राष्ट्रीय कर्तव्य आहे. या विधानसभा निवडणुकीत मतदान करून आपली लोकशाही बळकट करायला हवी. कोणत्याही प्रलोभनाला बळी न पडता निर्भयपणे आपण मतदानाचा अधिकार बजवायला हवा, असे आवाहन भिवंडी जनजागृती पथकाकडून करण्यात आले. यावेळी स्थानिक लोकशाहीत मतदानाला किती महत्व आहे व मतदान का करावे? याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.या मतदान जनजगृती कार्यक्रमात सहभागी असणाऱ्या कार्यालयातील कर्मचाऱ्यांना मी मतदान करणारंच... आपण ही आपल्या मतदानासाठी सज्ज रहा या आशयाचे मजकूर असलेले व त्यावर मतदान २० नोव्हेंबर २०२४ असे दर्शविणारे माहितीपत्रकाचेही वाटप करण्यात आले. यावेळी बोरीवली(पडघा), राहुर अर्जुनळी,भादाने, आन्हे ,भोकरी तर विविध गावांमध्ये मतदान जनजागृती करण्यात आली.




लोकशाहीच्या उत्सवात मतदानाच्या दिवशी देशाच्या भविष्यासाठी मतदानाचा हक्क बजावून लोकशाही बळकट करावी आणि सर्वांनी न चुकता २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान करावे, असे आवाहन सर्व मतदारांना करण्यात आले.

यावेळी मतदान जनजागृती पथक प्रमुख संजय अस्वले यांच्या मार्गद्शनाखाली १३४. भिवंडी ग्रामीण अ.ज. विधानसभा मतदान जनजागृती पथकामधी योगेशकुमार पाटील, काशीनाथ पाटील , सतीश जोशी, किरण पवार , दिनेश निक्ते सामील होते.

## महायुतीचे उमेदवार अजित पिंगळे यांचा विजयचा मार्ग मोकळा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/सुधाकर रणदिवे

धाराशिव- कळंब विधानसभा मतदारसंघात महायुतीचे उमेदवार अजित पिंगळे यांचे पारडे आता अधिक मजबूत झाले आहे कट्टर शिवसैनिक म्हणून ओळखले जाणारे अजित पिंगळे यांना शिवसेना (शिंदे गट)कडून उमेदवारी मिळाल्याने त्यांच्या विजयाची संधी अधिक वाढल्या आहेत.



या निवडणुकीत महत्त्वपूर्ण घटना पैकी एक म्हणजे अपक्ष उमेदवार म्हणून निवडणूक रिंगणात उतरलेले शिवसेनेचे जिल्हाध्यक्ष (शिंदे गट) सुरज साळुंखे, सुधीर पाटील आणि तालुक्यामध्ये मानणारा वर्ग शिवाजी आप्पा कापसे यांनी आपले अर्ज मागे घेतले आहेत. या ठिकाणीही महायुतीचे उमेदवार अजित पिंगळे यांना उघड पाठिंबा जाहीर केला आहे यामुळे आता महायुतीच्या उमेदवारासाठी स्पर्धा आणखी कमी झाले आहे. शिवसेना (शिंदे गट) भारतीय जनता पक्ष (भाजप )राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) आणि रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) या सर्व प्रमुख घटक पक्षांचा समावेश आहे. या सर्व पक्षांचे कार्यकर्ते एकत्र येऊन अजित पिंगळे यांना विजय करण्यासाठी परिश्रम करत आहेत धाराशिव मतदार संघात महायुतीच्या एकतेमुळे पिंगळे यांच्या विजयाचा मार्ग अधिक सुकर झाला आहे या सगळ्या राजकीय हालचालींच्या पार्श्वभूमीवर धाराशिव विधानसभा मतदारसंघात निवडणुकीची रंगत वाढली आहे मतदान २० नोव्हेंबर रोजी होणार असून मतदार आता कोणत्या बाजूला झुकतात याकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे, महायुतीच्या एकत्रित ताकदीमुळे अजित पिंगळे यांचे स्थान अधिक भक्कम झाले आहे असे मानले जात आहे.

**महाविकास आघाडीचा उमेदवार निवडून येणार**

**एकनाथ दादा पवार यांचे प्रतिपादन**

## लोहा -कंधार विधानसभा मतदारसंघांमध्ये परिवर्तन होणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लोहा/प्रतिनिधी

लोहा कंधार विधानसभा मतदारसंघांमध्ये महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार मा. एकनाथ दादा पवार यांच्या प्रचारार्थ शिवसेना (उ .बा. ठा )पक्षप्रमुख माजी मुख्यमंत्री आदरणीय मा.उद्धव ठाकरे साहेब यांची जंगी जाहीर सभा दि. ९-११-२४ रोज शनिवार या दिवशी सकाळी १०-३० वाजता कृषी उत्पन्न बाजार समिती मोंढा मैदान लोहा येथे होणार आहे.

त्या अनुषंगाने एकनाथ दादा पवार यांच्या कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेमध्ये बोलताना एकनाथ दादा यांनी लोहा कंधार विधानसभा मतदारसंघांमध्ये परिवर्तन अटळ असल्याची ग्वाही दिली. ते पुढे बोलताना म्हणाले की मा. रोहिदास चव्हाण साहेब यांनी लोहा



कंधार विधानसभा मतदारसंघांमध्ये शिवसेना वाढवली. मला मुलाप्रमाणे प्रेम दिले त्यांनी केलेल्या कामाची पावती म्हणून आगामी निवडणुकीमध्ये महाविकास आघाडीचा उमेदवार आमदार म्हणून शंभर टक्के निवडून येणार आहे .पुढे आपली भूमिका स्पष्ट करताना करताना दादांनी महाविकास आघाडीच्या पक्षांमध्ये कोणतेही मतभेद नाहीत असेही सांगितले.

या पत्रकार परिषदेला लातूर जिल्हा संपर्कप्रमुख लातूर जिल्हा संपर्कप्रमुख तथा शिवसेनेचे लोहा कंधार चे माजी आमदार रोहिदास चव्हाण, शिवसेनेचे लातुर जिल्हाप्रमुख बालाजी रेड्डी शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख संजय ढेपे,,काँग्रेसचे लोहा तालुकाध्यक्ष शरद पाटील पवार, काँग्रेसचे कंधार तालुकाध्यक्ष बालाजी पांडागळे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे लोहा तालुकाध्यक्ष प्रा. प्रभाकर पाटील पवार,शिवसेनेचे लोहा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक साहेबराव पाटील काळे, माजी पं.स. सदस्य नवनाथ उर्फ बापू चव्हाण माजी नगरसेवक बालाजी परदेशी,,काँग्रेसचे कंधार न.पा.चे माजी नगरसेवक शाहू नळगे,शिवसेनेचे लोहा-कंधार विधानसभा प्रमुख भाऊसाहेब पाटील कदम, शिवसेनेचे लोहा -कंधार समन्वयक सुरेश पाटील हिलाल,सुप्रसिद्ध निवेदक विक्रम कदम सर,, शिवसेनेचे लोहा तालुकाप्रमुख संजय पाटील ढाले, माजी जिल्हा परिषद सदस्य विठ्ठल शेटकर,शिवसेनेचे,शिवसेनेचे लोहा शहरप्रमुख खंडू पाटील पवार, शिवसेनेचे कंधार शहरप्रमुख अतुल पापीनवार,युवा सेनेचे जिल्हा समन्वयक योगेश पाटील नंदनवनकर, युवा सेनेचे लोहा -कंधार विधानसभा प्रमुख सतीश पाटील बाबर, युवा सेनेचे लोहा अधिकारी गजानन पाटील मोरे, युवक काँग्रेसचे बाबासाहेब पाटील बाबर, सरपंच रामेश्वर पाटील पवार, बाबाराव पाटील, दत्ता शेटे, सुभाष पाटील भालेराव, प्रकाश चव्हाण, भीमराव पाटील शिंदे,आदी उपस्थित होते.

सूत्रसंचालन विक्रम कदम यांनी केले तर आभार प्रदर्शन बालाजी पांडागळे यांनी मानले.